# प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजना

विमा कंपनीचा लोगो | योजनेचा लोगो | बँकेचे नाव<br>बँकेचा लोगो

## संमती पत्र / घोषणा फॉर्म

(ठरविलेल्या "नोंदणी काळात" योजनेत सामील होणाऱ्या सभासदांनी भरावा)

एजन्सी / बँक मित्र नाव / कोड ____________________

बचत खाते क्रमांक . | | | | | | | | | | | | | | | | | |

योजनेत सहभागी होण्याचा दिनांक : १ जून / जुलै / ऑगस्ट / सप्टेंबर 2015

| | |
|---|---|
| १. संपूर्ण नाव : | ५. मोबाईल / संपर्क क्रमांक : |
| २. पत्ता<br>____________________<br>____________________<br>____________________ | ६. आधार क्रमांक (उपलब्ध असल्यास) |
| ३. जन्मतारीख ( KYC त सामील असलेली ) (dd/mm/yyyy) | ७. कोणत्याही प्रकारचे अपंगत्व आहे काय? __________<br>असल्यास तपशील __________ |
| ४. इमेल ID : | ८. नामांकन धारकाचे नाव, पत्ता व नाते (असल्यास)<br>____________________<br>____________________ |
| ९. नामांकित व्यक्ती अज्ञान असेल तर पालकाचे नाव : | |

"प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजना" यासाठी वरील बँक ही मास्टर पॉलिसी धारक म्हणून काम करणार आहे. या योजनेत सहभागी होण्यासाठी मी संमती देत आहे.

मी तुम्हाला आपल्या शाखेत असणाऱ्या माझ्या बचत खात्यातून रुपये १२ अधिक सेवा कर (लागू असल्यास) काढून घेवून दर वर्षी ३१ मे अगोदर सदर विमा योजनेत नावे टाकण्यास अधिकृत करीत आहे. वेळोवेळी मला जसे कळविले / सांगितले जाईल तसे रुपये १२ किंवा जर योजनेत बदल झाल्यास सुधारित रक्कम, तुम्ही नावे टाकु शकता. ( यात लागू नसलेले वाक्य तुम्ही खोडू शकता)

माझ्या मृत्यू पश्चात योजनेचे सर्व फायदे मिळावेत यासाठी मी वर सांगितल्या प्रमाणे माझा वारस नामांकित करत आहे. जर माझ्या मृत्यू समयी नामांकन धारक वारस अज्ञान / १८ वर्षे वयाच्या खाली असेल तर त्याच्या कायदेशीर पालकाला वरील फायदे मिळावेत.

मी असे जाहीर करतो की मी प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजनेत अन्य कोणत्याही बँकेच्या खात्या मार्फत सहभागी झालेलो नाही. असे आढळल्यास माझे प्रीमियम जप्त करावे व त्यापासून मला योजनेचा फायदा मिळू नये.

मी मान्य करतो की , योजनेत सहभागी झाल्याच्या दिवसाच्या पुढील महिन्याच्या एक तारखे पासून मला विमा संरक्षण प्राप्त होईल.

मास्टर पॉलिसी सुरु झाल्या नंतर मी योजनेत सहभागी झालो तरी पूर्ण वार्षिक हप्ता भरण्याचे मी मान्य करत आहे.

मी मान्य करतो की, जो पर्यंत मी विम्याचे हप्ते वेळो वेळी भरत आहे व नूतनीकरणाच्या समयी 70 वर्षे पूर्ण करत आहे तोपर्यंत या योजनेत माझा सहभाग राहील.

मी मान्य करतो की मी योजनेचे सर्व नियम आणि कायदे यांचे पालन करेन. प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजनेत सहभागी होण्यासाठी आवश्यक असल्याप्रमाणे ____________________(विमा कंपनीचे नाव द्यावे) यांना माझा वैयक्तिक तपशील कळविण्यासाठी मी मान्यता देत आहे.

वरील सर्व विधाने ही सर्व बाबतीत सत्य असल्याचे मी घोषित करतो. वरील माहिती ही माझ्या या योजनेत सहभागी होण्याचा आधार आहे. वरील माहितीत असत्यता आढळल्यास या योजनेतील माझा सहभाग संपुष्टात येईल यास मी मान्यता देत आहे.

दिनांक :

____________________<br>खाते धारकाची स्वाक्षरी

प्रमाणित हस्ताक्षर<br>(शाखेतील बँक अधिकारी )

---

## पावती (अनुज्ञेय) आणि विमा संरक्षणाचा दाखला

प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजने अंतर्गत बचत खात्यातून परस्पर रक्कम वळती करण्यासाठी संमती व अधिकार देण्याचा फॉर्म श्री / श्रीमती ____________________ बचत खाते क्र.______________ आधार क्र. (असल्यास)__________ यांचेकडून मिळाला. सदर योजने अंतर्गत विमा संरक्षण ____________________(विमा कंपनीचे नाव) मास्टर पॉलिसी क्र.______________ यांचेशी संलग्न असून विमा संरक्षण वरील माहितीच्या सत्यतेवर / पात्रतेवर अवलंबून राहील.

बँकेच्या अधिकृत अधिकाऱ्याची स्वाक्षरी आणि शिक्का

# पंतप्रधान सुरक्षा विमा योजना

## क्लेम करण्याचा अर्ज

कोणत्याही देयक देण्याच्या हमीशिवाय हा अर्ज दिलेला असून तो मिळाल्या पासून सात दिवसांच्या आत तो पूर्ण भरून द्यावा.

| | क्लेम क्रमांक | | पॉलिसी क्रमांक |
|---|---|---|---|
| १. | संपूर्ण नाव ______<br>पत्ता ______<br>______<br>संपर्काचा क्रमांक | २. | बँकेचे नाव ______<br>आणि पत्ता ______<br>______<br>बचत खाते क्रमांक |
| ३. | अ) अपघात/ मृत्यू केव्हा झाला? दिवस, तारीख आणि वेळ सांगा.<br>ब) कुठे झाला?<br>क) मृत्यूचे/झालेल्या जखमांची सविस्तर माहिति सांगा. | | |
| ४. | उपचार करणाऱ्या डॉक्टरांचे नाव आणि पत्ता | | |
| ५. | गरज लागल्यास कंपनीचे इतर अधिकारी किवा वैद्यकीय अधिकाती तुम्हाला भेटू शकता काय? | अ)<br>ब) | |
| ६. | अ) मृत्यू झाला असेल तर,मूळ FIR /पोस्ट मॉरटम रिपोर्ट /मृत्यू चा दाखला जोडावा<br>ब) अपंगत्व आले असल्यास जिल्हा शल्य चीकीत्सकाचे अपंगत्व प्रमाणपत्र जोडावे | | |

मी वरील सर्व बाबी या सत्य असल्याचे जाहीर करतो. जर मी असत्य निवेदन केले असल्यास, काही सत्यता प्रकाशात नसेल आणली तर मिळणाऱ्या मोबदल्या वरील माझा हक्क काढून घेण्याचा अधिकार बँकेला असेल

तारीख

सही
(क्लेम करणारी व्यक्ती)

# पंतप्रधान सुरक्षा विमा योजनेचे नियम

**या योजनेचा तपशील :**
या योजनेत वर्षभरासाठी वैयक्तिक अपघाती विमा संरक्षण राहील ज्याचे दर वर्षी नुतनीकरण करावे लागेल. यात अपघाती मृत्यू, अपघातामुळे आलेले अपंगत्व या साठी संरक्षण राहील.ही योजना सार्वजनिक क्षेत्रातील विमा कंपन्या द्वारा (झब्र्क्ष्खऊ)आणि इतर सामान्य विमा कंपन्यांद्वारा राबविल्या जातील. ज्या या योजनेच्या नियमानुसार हेतू पूर्ण करण्यासाठी बँकांशी सहमत होतील. सहभागी बँका या त्यांच्या ग्राहकांसाठी अशी योजना राबविण्यासाठी कोणत्याही विमा कंपनीला यात सहभागी करू शकतात.

**संरक्षणाची व्याप्ती :** वर वर्षे १८ ते ७० या वयोगटातील सर्व बचत खाते धारक या योजने साठी पात्र राहतील . एकच किवा अनेक बँकेत बचत खाते असणाऱ्या व्यक्तीला फक्त एकच बचत खात्याद्वारे आणि (घधउ त समाविष्ट) आधार क्रमांका द्वारे या योजनेत सहभागी होता येईल.

**सहभाग काळ / त्यातील बदल :** या योजनेत विमा संरक्षण हे ३१ जून ते ३१ मे या काळा साठी एक वर्षा साठी राहील त्या साठी स्विकृती नमुन्यात परस्पर रुपये जमा करण्याचे संमती पात्र आवश्यक असून , दर वर्षी ३१ मे पर्यंत प्रीमियम भरता येईल त्याची वाढीव मुदत ३१ आगस्ट २०१५ ही पहिल्या वर्षा साठीच राहील. पहिल्या वर्षी भारत सरकारने योजनेत सहभागी होण्याची मुदत ३१ नोव्हेंबर अशी तीन महिन्यांसाठी वाढवून दिली आहे. वार्षिक प्रीमियम भरून योजनेत सहभागी होण्याचा काळ ठराविक असेल. खाते धारक ठराविक कालावधी साठी किवा अमर्यादित कालावधी साठी प्रीमियम परस्पर खात्यातून वजा करण्याचे निर्देश देवू शकतात.हे त्यांच्या अनुभवावर आधारित असेल. ज्यांनी योजनेतून आपला सहभाग काढून टाकला आहे ते वरील सांगितल्या प्रमाणे ठराविक वेळात परत सदस्य बनू शकतात. पात्र नवीन सदस्य, आणि ज्यांनी अगोदर सहभाग घेतला नाही ते पुढील वर्षात भविष्यात कधीही योजना चालू राहिली तर सदस्य बनू शकतात.

**फायदे : खालील तक्त्याप्रमाणे**

| | फायद्याचा तक्ता | विमा रककम |
|---|---|---|
| अ. | मृत्यू | दोन लाख रुपये |
| ब | दोन्ही डोळ्यांचा किवा दोन्ही हातांचा किवा पायांचा वापर करण्याची क्षमता गमावणे . किवा एका डोळ्याची आणि एका पायाची किवा एका हाताचा वापर करण्याची क्षमता गमावणे | दोन लाख रुपये |
| क. | एका डोळ्याची पूर्ण आणि परत न येवू शकणारी नजर किवा एक हात वा एक पाय गमावणे | एक लाख रुपये |

**प्रीमियम :** वार्षिक बारा रुपये प्रति सदस्य . प्रत्येक वर्षात जो पर्यंत योजना चालू आहे तो पर्यंत खाते धारकाच्या बचत खात्यातून परस्पर रुपये काढण्याच्या निर्देश नुसार १ जून पूर्वी काढले जातील. जर परस्पर रुपये १ जून नंतर काढले तर त्याचे विमा संरक्षण पुढील महिन्याच्या एक तारखे पासून सुरु होईल.

वार्षिक विमा क्लेम च्या अनुभवांना अनुसरून प्रीमियम बदलू शकतो. फक्त काही नैसर्गिक आपत्तींना सोडल्यास पहिल्या तीन वर्षात प्रीमियम जास्त प्रमाणात वाढणार नाही याची काळजी घेतली जाईल .

**पात्रता अटी :**

वर्षे १८ ते ७० या वयोगटातील सर्व बचत खाते धारक या योजने साठी पात्र राहतील त्या साठी स्विकृती नमुन्यात परस्पर रुपये जमा करण्याचे संमती पात्र आवश्यक असून ते असल्यास त्यांना योजनेत सहभागी करून घेण्यात येईल.

**मास्टर पॉलिसी धारक :** सहभागी बँक ही सहभागी ग्राहकाच्या वतीने मास्टर पॉलिसी धारक असेल . या बँकेने आणि विमा संरक्षण देणारी सामान्य विमा कंपनी यांनी साधी सोपी आणि ग्राहक हित दक्ष अस्थापना आणि क्लेम देणारी यंत्रणा उभारावी .

**संरक्षण संपुष्टी(संपणे) :** सदस्या चे अपघात विमा संरक्षण खालील प्रकारे संपुष्टात येवू शकते त्या वेळी विमा संरक्षण मिळणार नाही.

१) जन्म तारखेनुसार वय वर्ष ७० झाल्यावर (जी जवळ ची जन्मा तारीख असेल).

२) बचत खात्यात अपेक्षित शिल्लक नाही म्हणून आणि विमा प्रीमियम भरण्याच्या असमर्थतेत.

३) जर सदस्य हा एका पेक्षा जास्त बचत खात्या मार्फत या योजनेत संरक्षित असेल तर, अश्या वेळी विमा कंपनीला असे अनेक प्रीमियम प्राप्त झाले तर फक्त एकाच खात्या मार्फत विमा संरक्षण मिळेल आणि अन्य प्रीमियम परत केले जाणार नाहीत.

४) जर विमा संरक्षण काही तांत्रिक बाबीमुळे थांबले असेल तर, जसे देय तारखेला बचत खात्यात पुरेशी शिल्लक नसणे. किवा इतर आस्थापनेतील बाबीमुळे, वार्षिक प्रीमियम बाबतीत काही घोळ असणे, किवा योजनेच्या अटी जर पाळल्या गेल्या नसतील तर या काळात विमा संरक्षण निलंबित केले जावू शकते आणि विमा संरक्षण पुन्हा देणे हा विषय विमा कंपनीच्या अखत्यारीत आहे.

५) सहभागी बँका या परस्पर रक्कम काढण्या च्या निर्देशानुसार त्या महिन्यात रककम काढू शकतात. शक्यतो प्रति वर्षी मे महिन्यात. ती रककम लगेचच त्याच महिन्यातच विमा कंपनी कडे हस्तांतरित केली जाईल.

वरील योजनेची अंमलबजावणी विमा कंपनीच्या प्रमाणित पद्धती नुसार केली जाईल. माहितीची देवान घेवाण आणि ही माहिती च्या योग्य स्वरुपात वेग वेगळी केली जाईल.

योग्य वार्षिक प्रीमियम हे बचत खाते धारकाच्या खात्यातून ठराविक वेळेत **परस्पर पैसे काढण्याच्या प्रक्रियेनुसार** वरून काढणे ही जबाबदारी सहभागी बँकेची असेल.

सहभागी सदस्यांकडून **ठराविक नमुन्यातील सहभागी होण्याच्या फॉर्म** तसेच परस्पर **पैसे काढण्याचा फॉर्म** हे दस्तावेज सदर बँक जमा करून घेईल. विमा कंपनीला हे दस्तावेज परत मागविण्याचा अधिकार असेल.

अनुज्ञेय पावती ही अनुज्ञेय पावती आणि विमा दाखला म्हणून देता येईल.

योजनेचा आढावा हा वार्षिक अभ्यासावर घेतला असेल , पुनर्मुल्यांकन गरज पडल्यास केले जाईल.

**प्रीमियम चा तपशील :**

१) विमा कंपनीला प्रत्येक ग्राहक या प्रमाणे दहा रुपये असे प्रीमियम राहील

२) प्रत्येक ग्राहक या प्रमाणे दर वर्षी एक रुपया या प्रमाणे BC/Micro/Corporate/gent यांना खर्च देणे

३) प्रत्येक ग्राहक या प्रमाणे दर वर्षी एक रुपया या प्रमाणे बँके ला अस्थापना खर्च

योजनेची नियोजित सुरुवात दिनांक १ जून २०१५ अशी राहील. पुढील वर्षांचे प्रीमियम दरवर्षी जून महिन्याच्या पहिल्या तारखेला घेतला जाईल.

या योजनेची सांगता ही नुतनीकरणाच्या दिनांकाला होईल, जर अशी वेळ आलीच तर

**नेहमी विचारले जाणारे प्रश्न पुढील (FQs)**

पुढील पानावर दिले आहेत.

# प्रधान मंत्री सुरक्षा विमा योजना ( PMSBY)
# नेहमी विचारले जाणारे प्रश्न

**प्र १. या योजनेचे स्वरूप कसे आहे?**

या योजनेत वर्षभरासाठी वैयक्तिक अपघाती विमा संरक्षण राहील ज्याचे दर वर्षी नुतनीकरण करावे लागेल. यात मृत्यू साठी यावा संरक्षण देण्यात येईल.

**प्र२. या योजनेत कसा फायदा मिळेल आणि याचे विमा प्रीमियम कसे राहील ?**

| | | विम्याची रक्कम |
|---|---|---|
| a. | मृत्यू | रु. २ लाख |
| b. | दोन्ही डोळे/ दोन्ही हात/ दोन्ही पाय संपूर्णपणे गमावणे अथवा एका डोळ्याची नजर /एक हात / एक पाय गमावणे. | रु. २ लाख |
| c. | एका डोळ्याची नजर /एक हात / एक पाय संपूर्णपणे गमावणे | रु. १ लाख |

**या योजनेचा विमा प्रीमियम हा दर वर्षाला रुपये 12/- प्रत्येक वर्गणी दराने द्यावयाचा आहे .**

**प्र ३ . प्रीमियम कसे देता येईल ?**

प्रत्येक वर्षात जो पर्यंत योजना चालू आहे तो पर्यंत खाते धारकाच्या बचत खात्यातून परस्पर रुपये काढण्याच्या निर्देशा नुसार एकदाच जसे योजनेत सहभागी होतांना पर्याय निवडला असेल तसा घेण्यात येईल. योजना कार्यान्वित राही पर्यंत वर्गाणीदाराला प्रत्येक वर्षी खात्यातून रुपये काढण्यासाठी एकदाच संमती द्यावी लागेल. या योजनेचा आढावा सरकार दर वर्षी घेत राहील त्यानुसार पुढील नियम, बदलू शकतात.

**प्र ४ . ही योजना कोण देवू शकतो, त्याची अंमलबजावणी कोण करेल. ?**

ही योजना सार्वजनिक क्षेत्रातील जीवन विमा निगम LIC किवा इतर विमा कंपन्याद्वारा राबविली (PSGICs) जाईल. ज्या या योजनेच्या नियमानुसार हेतू पूर्ण करण्यासाठी बँकांशी सहमत होईल. सहभागी बँका या त्यांच्या ग्राहकांसाठी अशी योजना राबविण्यासाठी कोणत्याही विमा कंपनीला यात सहभागी करू शकतात.

**प्र ५. या योजनेत कुणाला सहभागी होता येईल** ?

वर्षे १८ ते ७० या वयोगटातील सहभागी बँकांतील सर्व बचत खातेधारक या योजने साठी पात्र राहतील. एकाच वेळी अनेक बँकात खाते असणाऱ्या ग्राहकाला फक्त एकच बचत खात्या मार्फत या योजनेत सहभागी होता येईल.

**प्र ६ . योजनेत सहभागी होण्याचा कालावधी कोणता आणि त्यातील बदल कसे आहेत** ?

या योजनेत विमा संरक्षण हे १ जून २०१५ ते ३१ २०१६ मे या काळा साठी एक वर्षा साठी राहील त्या साठी स्विकृती नमुन्यात परस्पर रुपये जमा करण्याचे संमती पत्र हे आवश्यक असून , दर वर्षी ३१ मे पर्यंत प्रीमियम भरता येईल त्याची वाढीव मुदत ३१ आगस्ट २०१५ ही पहिल्या वर्षा साठीच राहील. या नंतर सहभागी होणाऱ्या वर्गणी दारांना पूर्ण वार्षिक प्रीमियम द्यावे लागेल आणि स्वतः दिलेले स्वतःचे निरोगी असल्याचा दाखला द्यावा लागेल.

ज्यांना पुढील वर्षी योजनेत सहभागी व्हायचे आहे त्यांनी प्रीमियम परस्पर खात्यातून वजा करण्याचे निर्देश दर वर्षी ३१ मे पूर्वी द्यावे. . या नंतर सहभागी होणाऱ्या वर्गणी दारांना पूर्ण वार्षिक प्रीमियम द्यावे लागेल आणि स्वतः दिलेले स्वतःचे निरोगी असल्याचा दाखला द्यावा लागेल. सदस्य बनू शकतात. पात्र नवीन सदस्य, आणि ज्यांनी अगोदर सहभाग घेतला नाही ते पुढील वर्षात भविष्यात कधीही योजना चालू राहिली तर सदस्य बनू शकतात.

**प्र७. प्रथम वर्षी सहभागी होवू न शकणारा पात्र ग्राहक पुढील वर्षी या योजनेत सहभागी होवू शकतो काय??**

हो हो परस्पर पैसे काढण्याच्या सेवेनुसार नवीन पात्र सदस्य या योजनेत सहभागी होवू शकतात.त्यांनी प्रीमियम परस्पर खात्यातून वजा करण्याचे निर्देश देवून सहभागी होता येईल . स्वतः दिलेले स्वतःचे निरोगी असल्याचा दाखला द्यावा लागेल.

**प्र८. योजना सोडून जाणारा व्यक्ती परत योजनेत सहभागी होवू शकतो काय ?**

कोणत्याही क्षणी सोडून जाणारा व्यक्ती परत योजनेत सहभागी होवू शकतो, वार्षिक प्रीमियम देवून तो योजनेत प्रवेश करू शकतो .त्यासाठी त्याला स्वतः दिलेले स्वतःचे निरोगी असल्याचा दाखला द्यावा लागेल.

**प्र९. या योजनेत मास्टर पॉलिसी धारक कोण असेल ?**

सहभागी बँक ही सहभागी ग्राहकाच्या वतीने मास्टर पॉलिसी धारक असेल . या बँकेने आणि विमा संरक्षण देणारी जीवन विमा कंपनी LIC यांनी साधी सोपी आणि ग्राहक हितदक्ष अस्थापना आणि क्लेम देणारी यंत्रणा उभारावी

**प्र. १० . या योजनेतील सहभागी ग्राहकावरील जीवन संरक्षण केव्हा संपुष्टात येते ?**

सदस्याचे जीवन संरक्षण हे खालील बाबतीत संपते :

१) जन्म तारखेनुसार वय वर्ष ७० झाल्यावर (जी जवळची जन्मतारीख असेल).

२)बचत खात्यात अपेक्षित शिल्लक नाही म्हणून आणि जीवन विमा प्रीमियम भरण्याच्या असमर्थतेत .

३)जर सदस्य हा एका पेक्षा जास्त बचत खात्या मार्फत या योजनेत संरक्षित असेल तर , अश्या वेळी LIC /जीवन विमा कंपनीला असे अनेक प्रीमियम प्राप्त झाले तर फक्त २ लाख रुपयाचे जीवन विमा संरक्षण मिळेल आणि अन्य प्रीमियम परत केले जाणार नाहीत.

**प्र११. या योजनेत विमा कंपनी आणि बँक यांची भूमिका काय राहील ?**

१ ही योजना सार्वजनिक क्षेत्रातील जीवन विमा कंपनीLIC द्वारा आणि जीवन विमा कंपन्यांद्वारा (PSGICs) राबविल्या जातील. या योजनेच्या नियमानुसार सामाईक हेतू पूर्ण करण्यासाठी बँकांशी सहमत होतील. सहभागी बँका या त्यांच्या ग्राहकांसाठी अशी योजना राबविण्यासाठी कोणत्याही जीवन विमा कंपनीला यात सहभागी करू शकतात .

२ योग्य वार्षिक प्रीमियम हे बचत खाते धारकाच्या खात्यातून ठराविक वेळेत आणि एकाच हप्त्यात **परस्पर पैसे काढण्याच्या प्रक्रियेनुसार** वरून काढणे ही जबाबदारी सहभागी बँकेची असेल .

सहभागी सदस्यांकडून ठराविक **नमुन्यातील सहभागी होण्याच्या फॉर्म** आणि संमती पत्र तसेच **परस्पर पैसे काढण्याचा फॉर्म** हे दस्तावेज सदर बँक जमा करून घेईल. LIC जीवन विमा कंपनी ला हे दस्तावेज परत कधीही मागविण्याचा अधिकार असेल.

**प्र१२. प्रीमियम चा तपशील सांगा ?**

१) (PSGICs) / ***अन्य जीवन*** विमा कंपनीला प्रत्येक ग्राहक या प्रमाणे १०/- रुपये वार्षिक असे प्रीमियम राहील

२) प्रत्येक ग्राहक या प्रमाणे दर वर्षी १/- रुपये या प्रमाणे BC/Micro/Corporate/Agentयांना खर्च देणे

३) प्रत्येक ग्राहक या प्रमाणे दर वर्षी १/- रुपये या प्रमाणे बँके ला अस्थापना खर्च मिळेल.

**प्र १३. हे विमा संरक्षण ग्राहकाने घेतलेल्या अन्य विमा संरक्षणाच्या व्यतिरिक्त असेल काय ?**

होय.

.

**प्र १४. नैसर्गिक आपत्ती जसे की भूकंप, पूर इ. मुळे होणारे मृत्यू/ अपंगपणा या कारणांना ही योजना लागू असेल का ? तसेच खून/ आत्महत्या यासारख्या घटनांदेखील ही योजना लागू असेल का ?**

या वरील सर्व घटना प्रधान मंत्री सुरक्षा विमा ( PMSBY) योजनेअंतर्गत कव्हर केल्या जातील.

**प्र १५. सर्व जॉइंट खाते धारक उल्लेख केला गेलेल्या खात्याद्वारे हया योजनेत सहभागी होऊ शकतात का ?**

जर ते पात्रतेचे निकष पूर्ण करत असतील आणि प्रती व्यक्ती दर वर्षी रू. ३३०/- या दराने प्रिमीयम (हप्ता) भरत असतील तर सर्व जॉइंट खाते धारक उल्लेख केला गेलेल्या खात्याद्वारे हया योजनेत सहभागी होऊ शकतात.

**प्र.१६. प्रधान मंत्री सुरक्षा विमा ( PMSBY) योजनेसाठी कुठले बँक खाते योग्य असेल ?**

संस्थांशी संबंधित खाते वगळता सर्व प्रकारच्या खात्यांचे धारक या योजनेसाठी पात्र असतील.

**प्र १७ परदेशस्थ भारतीय (एन.आर.आय.) कव्हरेज मिळण्यासाठी प्रधान मंत्री सुरक्षा विमा ( PMSBY) योजनेअंतर्गत पात्र असतील का ?**

कुठल्याही भारतीय बँकेच्या शाखेत योग्य बँक खाते असलेला कुणीही परदेशस्थ भारतीय प्रधान मंत्री सुरक्षा विमा योजनेसाठी पात्र असेल मात्र योजनेशी संबंधित अटी आणि शर्तींच्या अधीन राहुन. क्लेमचा प्रश्न उद्भवल्यास लाभधारक/हक्कदारास क्लेम फक्त भारतीय चलनाच्या स्वरुपातच मिळेल.

**प्र. १८ मृत्यू अथवा अपंगत्व यातून निर्माण होणाऱ्या अपघाताचा व त्याचा हॉस्पिटलायझेशनचा खर्च परत मिळण्याची कोणतीह तरतूद आहे ?**

नाही.

**प्र. १९. ज्या खातेधारकाने नोंदणी अर्ज भरलेला आहे आणि त्याचा मृत्यू झाल्यास विम्याचा लाभ कोण घेऊ शकते ?**

ज्या खातेधारकाने नोंदणी अर्ज भरलेला आहे आणि त्याचा मृत्यू झाल्यास विम्याचा लाभ नामनिर्देशित व्यक्तीस मिळेल, आणि जर नामनिर्देशन केले नसेल तर कायदेशीर वारसाला मिळेल.

**प्र. २०. क्लेमची किंमत कश्या स्वरुपात दिली जाईल ?**

अपंगत्वाचा क्लेम खातेधारकाच्या बँक खात्यात भरला जाईल. मृत्यूचा क्लेम नामनिर्देशित व्यक्ती/ कायदेशीर वारसाच्या खात्यात भरला जाईल.

**प्र. २१. जर खातेधारकाने आत्महत्या केल्यास त्याच्या कुटुंबाला विम्याचा लाभ मिळेल का ?**

नाही.

**प्र. २२. पॉलिसीतून मिळणारे लाभ घेण्यासाठी अपघाताची नोंद पोलीसांकडे करणे आणि FIR दाखल करणे गरजेचे आहे का ?**

रेल्वे, मार्गावरील अथवा इतर वाहनांचे अपघात झाल्यास, व्यक्ती पाण्यात बुडली असल्यास, मृत्यू गुन्हयाशी संबंधित असल्यास अपघाताची नोंद पोलीसांकडे करणे गरजेचे आहे. साप/नाग चावणे, झाडावरुन पडणे इ. घड्ल्यास त्वरीत त्याची वैद्यकीय नोंद होणे आवश्यक आहे.

**प्र. २३. जर विमाधारक हरवला असेल आणि मृत्यू झाला याची खात्री नसेल तर विम्याचा लाभ कायदेशीर वारसांना मिळेल का ?**

मृत्यू झाला याची खात्री झाल्यावरच विम्याचा लाभ मिळतो अथवा मृत्यू झाला असे मानल्यानंतर सात वर्षाच्या कालावधीनंतर मिळतो.

**प्र. २४. जर व्यक्ती एका डोळ्याची नजर /एक हात / एक पाय संपूर्णपणे गमावणे याशिवाय जर आंशिक अपंग असेल तर विम्याचा लाभ मिळेल का ?**

लाभ मिळणार नाही.

**प्र. २५. जर विमाधारकाने एकापेक्षा जास्त बँक्समध्ये नोंदणी केली असेल आणि हप्ते भरले असतील तर त्याला त्या सगळ्या बँक्सकडून विम्याचा लाभ मिळेल का ?**
नाही. त्याला तसा लाभ मिळणार नाही.

प्र. **२६. प्रधान मंत्री सुरक्षा विमा (PMSBY) योजनेच्या पॉलिसीज (धोरणे) परदेशी विमा पॉलिसीजच्या साहाय्याने सुरु झाल्या आहेत का आणि काम करत आहेत का ?**
भारतात अशा कुठल्याही परदेशी विमा कंपनीज थेटपणे काम करत नाहीत. विमा कायदा आणि IRDA नियमांनुसार भारतीय कंपनीज बरोबर काही परदेशी नवीन काम करीत आहेत, जेथे त्यांचा समभाग ४९% पर्यंतच मर्यादित आहे.

**प्र. २७. प्रधान मंत्री सुरक्षा विमा (PMSBY) योजना, जिचा आग्रहाने प्रसार केला जात आहे आणि विकली जात आहे ती परदेशी विमा कंपनीजना, ज्या भारतीय कंपनीज बरोबर काम करीत आहेत, त्यांना मोठ्या प्रमाणात नफा मिळवून देईल का ?**
MsM मध्ये फक्त फक्त विमा कायद्याने उल्लेखित केलेल्या भारतीय विमा कंपनीज काम करु शकतात. परदेशी विमा कंपनीज बरोबर काम करणाऱ्या अश्या कंपनीतील विमाधारकांचे फंड्स नियमानुसार भारतात गुंतविले जातात आणि परदेशात नाही. या योजनेत घेतला जाणारा हप्ता हा विमाशास्त्रीय शुल्क, जोखमीचे घटक, सध्याचा मृत्यूदर यांचा विचार करुन घेतले जातात. त्यामुळे योजनेतून कोणत्याही मोठ्या प्रमाणात नफा मिळण्याची शक्यता नाही.

**प्र. २८ सार्वजनिक क्षेत्रातील जनरल इन्शुरन्स कंपन्यांसारख्या (PSGICs) सरकारी संस्था, ज्या ही सरकारी योजना चालवू शकली असती, असे असताना परदेशी विमा कंपनीज प्रधान मंत्री सुरक्षा विमा (PMSBY) योजनेशी का संबंधित आहेत ?**
भारतात २१ सार्वजनिक क्षेत्रातील जनरल इन्शुरन्स कंपनीज (PSGICs) कार्यरत आहेत, ज्यांना विमा व्यवसाय करण्यासाठी IRDAI कडून परवाना मिळाला आहे. स्पर्धा वाढविण्यासाठी, ग्राहकांना उत्तम सेवा आणि योग्य किंमत देण्यासाठी या सर्व कंपन्यांना सहभागी होण्याची परवानगी आहे. त्या सर्व भारतीय कंपन्यांचे परदेशी भागीदार असल्यास त्यांचा कंपनीत फक्त ४९% पर्यंतच समभाग असतो. म्हणूनच सार्वजनिक क्षेत्रातील जनरल इन्शुरन्स कंपनीज (PSGICs) ह्याच या योजनेतील एकमेव प्राथमिक विमा कंपनी आहे.

**प्र. २९. क्लेम्सची पूर्तता न झाल्यास भारतातील परदेशी विमा कंपनीजवर काही कायदेशीर कारवाई करता येणे शक्य आहे का ?**
भारतात अशा कुठल्याही परदेशी विमा कंपनीज थेटपणे काम करत नाहीत. विमा कायदा आणि IRDA नियमांनुसार भारतीय कंपनीज बरोबर काही परदेशी नवीन काम करीत आहेत, जेथे त्यांचा समभाग ४९% पर्यंतच मर्यादित आहे. व्याख्येनुसार त्या भारतीय विमा कंपनीजच आहेत. त्या सर्व कंपनीज भारतीय कायद्याच्या आधीन आहेत आणि त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करता येणे शक्य आहे.

**प्र. ३०. हप्त्याचे दर वाढू शकतात. किंवा कंपनीज भविष्यात योजना बंद करु शकतात का ?**
विमा हा इतर सेवांसारखाच असतो. हप्त्याचे दर भविष्यात वाढू शकतात, २१ भारतीय विमा कंपनीत असलेल्या स्पर्धेमुळे दर स्थिर राहण्याची शक्यता आहे. प्रधान मंत्री सुरक्षा विमा योजना ( PMSBY) व्यवहार्य असेल आणि ती बंद व्हायची शक्यता कमी आहे जर काही विशिष्ट परिस्थितीत असे काही घडलेच तर बँकेकडे इतर ठिकाणी भागीदारी करण्याचे पर्याय उपलब्ध असतात.